जनसंपर्क कक्ष
20 JAN 2024 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ स्पर्धेत चमकदार कामगिरी बजावणाऱ्या क्रीडापटूंसमवेत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे आदी.


# आंतरविद्यापीठ महोत्सवातील खेळाडूंचा गौरव

कोल्हापूर, ता. १९ : नागपूर येथे झालेल्या महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सवातील उज्ज्वल कामगिरीबद्दल शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडापटूंचा आज सकाळी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात २५ वी आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सव स्पर्धा १२ ते १६ जानेवारीदरम्यान पार पडली. स्पर्धेच्या पहिल्या टप्प्यात शिवाजी विद्यापीठाच्या ॲथलेटिक्स (पुरुष व महिला) संघाने सर्वसाधारण विजेतेपद, बॅडमिंटन (पुरुष व महिला) संघाने तृतीय क्रमांक, टेबल टेनिस (पुरुष) संघाने तृतीय क्रमांक, व्हॉलीबॉल (पुरुष) संघाने द्वितीय क्रमांक मिळविला. त्याबद्दल कुलगुरू डॉ. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते यशस्वी खेळाडूंचा सत्कार करण्यात आला.

क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी स्वागत केले. क्रीडा महोत्सव स्पर्धेचे पथकप्रमुख डॉ. सुनील चव्हाण यांनी स्पर्धेतील खेळाडूंच्या कामगिरीविषयक अहवालाचे वाचन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : राज्य आंतरविद्यापीठ स्पर्धेमध्ये चमकदार कामगिरी बजावणाऱ्या क्रीडापटूंसमवेत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे आदी.

# राज्य आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सवातील खेळाडूंचा गौरव

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

नागपूर येथे झालेल्या राज्य आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सवामधील उज्ज्वल कामगिरीबद्दल शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडापटूंचा कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

१२ ते १६ जानेवारीदरम्यान राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात २५ वी आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सव स्पर्धा पार पडली. स्पर्धेच्या पहिल्या टप्प्यात शिवाजी विद्यापीठाच्या ॲथलेटिक्स (पुरुष व महिला) संघाने सर्वसाधारण विजेतेपद, बॅडमिंटन (पुरुष व महिला) संघाने तृतीय क्रमांक, टेबल टेनिस (पुरुष) संघाने तृतीय क्रमांक, व्हॉलीबॉल (पुरुष) संघाने द्वितीय क्रमांक प्राप्त केला. कुलगुरू डॉ. शिर्के यांनी यशस्वी क्रीडापटूंचे अभिनंदन केले. क्रीडापटूंना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विद्यापीठ प्रशासन प्रयत्नशील असल्याची ग्वाही दिली.

क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी प्रास्ताविक केले. याप्रसंगी क्रीडा महोत्सव स्पर्धेचे पथकप्रमुख डॉ. सुनील चव्हाण यांनी स्पर्धेतील खेळाडूंच्या कामगिरीविषयक अहवालाचे वाचन केले. प्रा. किरण पाटील, प्रा. सुचय खोपडे यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. एन. डी. पाटील, डॉ. राजेंद्र रायकर, डॉ. बाळासाहेब भोसले, डॉ. राहुल इंगळे, डॉ. सविता भोसले, डॉ. इब्राहीम मुल्ला, अजय मराठे, सचिन पाटील यांच्यासह क्रीडापटूंचे पालक उपस्थित होते.

20 JAN 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात ५७ वर्षांपूर्वी 'रामायणा'वर संशोधन

## प्रा. उपाध्ये, वसंत जोशी, अंजली पर्वते यांचा अभ्यास; भावार्थ, अध्यात्म पैलूंवर प्रकाशझोत

संतोष मिठारी: सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १९ : वाल्मिकी ऋषींनी रचलेले 'रामायण' हे महाकाव्य आणि हिंदू धर्मातील पवित्र ग्रंथ आहे. या 'रामायणा' वर ५७ वर्षांपूर्वी शिवाजी विद्यापीठात संशोधन झाले आहे. त्यात तुलनात्मक, भावार्थ, अध्यात्मक पैलूंनी मांडलेले प्रा. टी. पी. उपाध्ये, कोल्हापुरातील वसंत म. जोशी आणि पुणे येथील अंजली माधव पर्वते यांनी अभ्यास करून पीएच.डी. पदवी मिळविली आहे.

मराठी अधिविभागातून सांगलीतील प्रा. त. प. तथा टी. पी. उपाध्ये यांनी सन १९६७ मध्ये 'मराठीतील रामायणे आणि प्राकृतातील रामायणे' यांचा तुलनात्मक अभ्यास केला. त्यांचे मार्गदर्शक कोल्हापुरातील डॉ. दु. का. संत होते. त्यांनी इ. स. १८०० अखेरपर्यंतच्या मराठीतील आणि प्राकृतातील रामायणांची कथादृष्ट्या तुलना केली आहे. त्यांनी रामायण कथेची वेगळ्या भूमिकेतून पाहणी केली आहे.

कोल्हापुरातील संत साहित्याचे अभ्यासक वसंत जोशी यांनी सोलापूरमधील डॉ. वि. म. कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली 'श्री एकनाथकृत भावार्थ रामायणाचा विवेचक अभ्यास' या विषयावर संशोधन केले. त्यांनी याबाबतचा अभ्यासाचा प्रबंध सन १९६८ मध्ये शिवाजी विद्यापीठाला



सादर केला. 'भावार्थ रामायण' हा एकनाथांच्या प्रतिभेच्या विविध पैलूंचे दर्शन घडविणारा व मराठी साहित्यात प्रदीर्घ काव्यलेखनाची परंपरा सुरू करणारा ग्रंथ आहे. एकनाथांनी नवविचार देणाऱ्या रामचरित्राची केलेली कालोचित मांडणी, मूळ वाल्मिकी रामायणाची संस्कृत व प्राकृत भाषातील स्थित्यंतरे आणि मराठीतील रामकथालेखनाचा परामर्श जोशी यांनी प्रबंधातून मांडला.

कलाशाखेत संस्कृत विषयामध्ये पीएच.डी. पदवीसाठी अंजली पर्वते यांनी 'अध्यात्म रामायण: एक चिकित्सक अभ्यास' याविषयावर संशोधन करून सन १९९५ मध्ये विद्यापीठाला प्रबंध सादर केला. त्यांना मार्गदर्शक म्हणून सांगलीमधील विलिंग्डन महाविद्यालयातील निवृत्त संस्कृत विभागप्रमुख डॉ. के. वा. आपटे लाभले. पर्वते यांनी तौलनिक अभ्यास केला. त्यांना अध्यात्म रामायण हे शांकर अद्वैताचा पुरस्कार करणारे असल्याचे संशोधनातून सर्वांसमोर मांडले.

### भावार्थ रामायणाचा विवेचक अभ्यास असा

- वसंत जोशी यांनी एकनाथ जीवन: शोध आणि बोध, एकनाथ युग, रामकथेची निर्मिती व स्थित्यंतरे, वाल्मीकि रामायण व भावार्थ रामायण: तौलनिकअभ्यास भावार्थ रामायण व मराठी रामकथा, भावार्थ रामायण: प्रेरणा व रचना, काव्यविशेष, लेखनाची प्रेरणा, परमार्थ विचार, अहिरावणाख्यान, उत्तरकांडाची समस्या या पैलूंतून विवेचक अभ्यास केला आहे.

### 'अध्यात्म रामायणा'च्या विविध मुद्यांवर संशोधन

- अंजली पर्वते यांनी अध्यात्म रामायण: कर्तृत्व आणि काळ, मूलस्रोत वाल्मिकी रामायण आणि अध्यात्म रामायण, अन्य रामायणे-कथानकांचा तौलनिक अभ्यास, तत्वज्ञानाचे स्वरूप, तुलनात्मक विचार, वाङ्मयीन अभ्यास या मुद्यांवर संशोधनात्मक अभ्यास केला आहे.

### रामायणांचा तुलनात्मक अभ्यास

- प्रा. टी. पी. उपाध्ये यांनी वाल्मिकी रामायण, अवतार कल्पना, रामावतार, त्यावरील महत्त्वाचे संस्कृत साहित्य, प्राचीन मराठी रामायणीय काव्यरचनेतील प्रवाह, बालकांड, अयोध्याकांड, अरण्यकांड, किष्किंधाकांड, सुंदरकांड, युद्ध आणि उत्तरकांड यांचा अभ्यास केला आहे.

20 JAN 2024 सकाळ

जनसंपर्क कक्ष

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बहुविद्याशाखीय संशोधनांवर भर



## अधिविभाग, महाविद्यालयांना विद्यापीठाकडून निधी

**कोल्हापूर, ता. १९ : परंपरा आणि नावीन्याची सांगड घालून वाटचाल करत असलेल्या शिवाजी विद्यापीठाचा आता बहुविद्याशाखीय, आंतरविद्याशाखीय नावीन्यपूर्ण संशोधनावर भर वाढत आहे. लोकांचे राहणीमान, जीवनशैली, शिक्षण, आरोग्य, आदींमध्ये सुधारणा व्हावी, या उद्देशाने समाजोपयोगी विषय घेऊन संशोधन करण्याकडे विद्यापीठाची नेटाने वाटचाल सुरू आहे. मटेरियल सायन्समध्ये विद्यापीठाची आघाडी आहे.**

**संतोष मिठारी**

बिग स्टोरी

### ७१ बौद्धिक संपदा हक्क

नावीन्यपूर्ण संशोधनात विद्यापीठाचा टक्का सातत्याने उंचावत असून, विद्यापीठाचा एच इंडेक्स १३२ असून, एकूण ९२२१ प्रकाशित शोधनिबंधांना एक लाख ३६ हजार ६३९ इतकी सायटेशन्स (विद्यापीठातील संशोधकांच्या शोधनिबंधांचा जगातील अन्य संशोधकांनी त्यांच्या संशोधनामध्ये संदर्भ देणे.) मिळाली आहेत. विविध विषयांतील ७१ बौद्धिक संपदा हक्क (पेटंट) मिळाली आहेत. गेल्या वर्षात सहा पेटंट मिळाले असून, आठ पेटंटची नोंद झाली आहे. विद्यापीठ अधिविभागांतील व संलग्नित महाविद्यालयांतील शिक्षकांना संशोधनासाठी प्रोत्साहन म्हणून विविध योजनांसाठी एकूण एक कोटी सहा लाख ४२ हजार ४८० रुपयांचा निधी दिला आहे.

### नवी दिशा अशी

सात वर्षांपासून विद्यापीठाने संशोधनाच्या नव्या दिशेने वाटचाल सुरू केली आहे. त्याची सुरुवात आंतरविद्याशाखीय संशोधनापासून झाली. त्यात उदाहरण द्यायचे झाले, तर भौतिकशास्त्रातील प्राध्यापक, विद्यार्थ्यांना जीवशास्त्र, वनस्पतीशास्त्रातील संशोधन करता येते. विविध विभागांच्या सहकार्यातून संशोधन केले जात आहे. त्यादृष्टीने संशोधन प्रकल्प मंजूर झाले असल्याचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी सांगितले.

विविध विभागांतील प्राध्यापक, विद्यार्थी एकत्रित येऊन संशोधन, उत्पादन निर्मितीचे काम करीत आहेत. त्यातून नवीन संशोधन, ज्ञाननिर्मिती होत असल्याचे त्यांनी सांगितले.

### तेच तेच विषय नको म्हणून दक्षता

संशोधनात तेच तेच विषय येऊ नयेत यासाठी मार्गदर्शक सूचना प्राध्यापक, विद्यार्थ्यांना केल्या जात आहेत. वाङ्‌मय चौर्य शोधण्यासाठी संगणकप्रणाली कार्यान्वित आहे. त्याद्वारे तपासणी केली जाते. त्यात सापडलेल्या आणि वाङ्‌मय चौर्य केलेल्या संशोधकाला त्याचा शोधनिबंध सादर करता येत नाही. पर्यावरणपूरक, शाश्वत विकासाचे मुद्यांसह संशोधनाचा सामाजिक परिणाम काय? या निकषातून विषयांची निवड केली जात असल्याचे प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी सांगितले.

## विद्याशाखानिहाय संशोधन

### विज्ञान व तंत्रज्ञान

या विद्याशाखेत जैवविविधता आणि संवर्धन, पर्यावरणपूरक कीड व्यवस्थापन आणि पेंट निर्मिती, तणावाने होणारे विकार, थिन फिल्म, सुपर कपॅसिटर, सोलर सेल, प्लेटिंग आणि इलेक्ट्रो प्लेटिंग, लिथियम बॅटरी, अँटिबॅक्टेरियल मटेरियल, सूर्यप्रकाशाच्या मदतीने पाण्यातील रंगद्रव्य विघळणे, आयओटी बेस्ड सेन्सर, याबाबत संशोधन सुरू असल्याचे अधिष्ठाता डॉ. सरिता ठकार यांनी सांगितले.

### या क्षेत्रात संशोधनाची संधी

- कृत्रिम बुद्धिमत्ता,
- सायबर सिक्युरिटी
- रोबोटिक्स ड्रोन
- अर्थ तंत्रज्ञान
- 'सोशल क्लिनिक' अंतर्गत ज्येष्ठ नागरिक, लहान मुले, महिलांच्या प्रश्नांवर संशोधन,
- ई-वेस्ट संकल्पना
- ई-कॉमर्स
- जोखीम व्यवस्थापन
- आयात-निर्यात व आंतरराष्ट्रीय व्यापार
- सामाजिकशास्त्रे व वाणिज्य व्यवस्थापन

### आंतरविद्याशाखीय


या विद्याशाखेत शिक्षणातील अध्ययन-अध्यापन, मूल्यमापन, विद्यार्थी खेळाडूंची मानसिक, भावनिक, शारीरिक जोपासणा, संगीत, नाट्य क्षेत्रांतील प्रायोगिक चळवळी आणि घडामोडी, अन्नधान्यावरील प्रक्रिया, शासकीय योजना आणि त्यांचे समाजावरील परिणाम यांसह समाजोपयोगी संशोधनावर भर दिला जात असल्याचे अधिष्ठाता डॉ. मेघा गुळवणी यांनी सांगितले.


### वाणिज्य व व्यवस्थापन

या विद्याशाखेमध्ये विपणनशास्त्र, ग्राहक वर्तन, मनुष्य संसाधन-वित्तीय-उत्पादन व्यवस्थापन, उद्योजकता विकास, बँकिंग, सहकार, कॉर्पोरेट क्षेत्रांतील विषयांवर संशोधन झाले आहे. आंतरविद्याशाखीय संशोधनासाठी प्रोत्साहन दिले आहे. त्यामुळे इतिहासामध्ये रुची असलेल्या कॉमर्सच्या विद्यार्थ्याने छत्रपती शिवाजी महाराजांचा अभ्यास व्यवस्थापनाच्या अंगाने, तर संगीताची आवड असलेल्या व्यवस्थापनाच्या विद्यार्थ्याने विपणन क्षेत्रामध्ये संगीताचा प्रभाव याबाबत अभ्यास केला असल्याचे अधिष्ठाता प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी सांगितले.

### मानव्यविद्याशाखा

या शाखेत नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासनाने राबविलेल्या विविध योजनांच्या परिणामांचा अभ्यास केला जात आहे. सांगली, सोलापूर, यवतमाळ, आदी जिल्ह्यांचे व्हिजन डॉक्युमेंट तयार केले जात आहे. विविध योजनांचे मूल्यमापन, पर्यावरण आणि पाणी संवर्धनाच्या अनुषंगाने संशोधन सुरू असल्याचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख यांनी सांगितले.



जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 JAN 2024
लोकमत

# आता विद्यापीठांच्या दीक्षांत समारंभातील झगमगाट बंद

लोकमत न्यूज नेटवर्क

जळगाव : विद्यापीठांच्या दीक्षांत समारंभातील झगमगाट आता बंद होणार आहेत. दीक्षांत समारंभात हातमागावरील भारतीय पोषाख परिधान करावेत, असे निर्देश विद्यापीठ अनुदान आयोगाने दिले आहेत.

विद्यापीठे, उच्च शैक्षणिक संस्थांमधील ग्रॅज्युएशन डे किंवा दीक्षांत समारंभ म्हटला की सिंथेटिकचे चमकदार ग्रॅज्युएशन गाऊन आणि त्या त्या संस्थेचा ठरलेला ड्रेसकोड, अशी पद्धत आहे. आता हे चित्र कालबाह्य होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 JAN 2024
लोकमत

# यूजीसी-नेटचा निकाल जाहीर

लोकमत न्यूज नेटवर्क,

मुंबई : पदवी महाविद्यालये अथवा विद्यापीठांमधील व्याख्याता पदासाठी आवश्यक असलेल्या यूजीसी-नेट या पात्रता परीक्षेचा निकाल अखेर एक दिवसाच्या विलंबाने जाहीर झाला आहे. तांत्रिक अडणीमुळे हा निकाल लांबला होता.

'नॅशनल टेस्टिंग एजन्सी'ने (एनटीए) ६ ते १९ डिसेंबर २०२३ या कालावधीत घेतलेल्या यूजीसी-नेट या परीक्षेत देशभरातून ९,४५,९१५ विद्यार्थी बसले होते. देशभरातील २९२ शहरांमध्ये ८३ विषयांमध्ये यूजीसी-नेट झाली. हा निकाल १७ जानेवारीला जाहीर होणार होता. मात्र, तांत्रिक अडचणीमुळे दिलेल्या तारखेला तो जाहीर होऊ शकला नाही. १८ जानेवारीला रात्री उशिरा निकाल जाहीर करण्यात आला.

विद्यार्थ्यांना आपले लॉगइन करून पुढील संकेतस्थळावर हा निकाल पाहता येईल. संकेतस्थळ - ugcnet.nta.ac.in किंवा nta.ac.in

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 JAN 2024
सकाळ

# घाळी कॉलेजच्या पाच खेळाडूंची आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी निवड

गडहिंग्लज, ता. १९ : येथील डॉ. घाळी महाविद्यालयातील पाच खेळाडूंची ग्वाल्हेरच्या आयटीएम विद्यापीठात होणाऱ्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ महिला हॉकी विद्यापीठ संघात निवड झाली. त्यात गोलरक्षक स्वाती फुटाणे, मोनिका आरबोळे, विद्या नगरे, अमृता जाधव, कृष्णा माने या खेळाडूंचा समावेश आहे.

यापूर्वी कॉलेजच्या संघाने शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय हॉकी स्पर्धेत विजेतेपद पटकावले आहे. या सर्वांना विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. सतीश घाळी, प्राचार्य डॉ. शिवानंद मस्ती, उपाध्यक्ष अरविंद कित्तूरकर, सचिव बी. जी. भोसकी, सहसचिव गजेंद्र बंदी, संचालक किशोर हंजी, महेश घाळी, डॉ. कोल्हापुरे, विकास पाटील, संगाप्पाण्णा दड्डी यांचे प्रोत्साहन तर प्रा. विकास अतिग्रे, मनोहर मांगले, अनिकेत मोटे यांचे मार्गदर्शन मिळाले.



गडहिंग्लज : घाळी महाविद्यालयाच्या या पाच खेळाडूंची हॉकीच्या आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 JAN 2024
तरुण भारत

# अश्वमेधमध्ये शिवाजी विद्यापीठाला कास्य

प्रतिनिधी
कोल्हापूर

नागपूरात झालेल्या २५ व्या महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धेअंतर्गत (अश्वमेध) झालेल्या टेबल टेनिस स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या पुरुष संघाने उत्तम कामगिरी केली. स्पर्धेअंतर्गत कांस्यपदकासाठी झालेल्या सामन्यात शिवाजी विद्यापीठ संघाने बलाढ्य मुंबईच्या मुंबई विद्यापीठ संघाला २–१ गुणफरकाने पराभूत केले. शिवाजी विद्यापीठ संघातून कप्तान ऋषीकेश नलवडे, अनिष सोनटक्के, अद्वैत बोंद्रे, झेद स्वार यांनी स्पर्धेत प्रतिनिधीत्व केले होते.

दरम्यान, कांस्य पदकासाठीच्या लढतीपर्यंत पोहोचण्यापूर्वी शिवाजी विद्यापीठ संघाने स्पर्धेत ५ सामने जिंकून उपांत्य फेरीत प्रवेश केला होता. उपांत्य फेरीतील सामन्यात मात्र नागपुरातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ संघाकडून शिवाजी विद्यापीठ संघाला पराभव स्वीकारावा लागला. त्यामुळे शिवाजी विद्यापीठ संघाला कांस्यपदकासाठी मुंबई विद्यापीठ संघासोबत सामना खेळावा लागला होता. शिवाजी विद्यापीठ संघाने जिद्दीने मुंबई विद्यापीठ संघाला लढत देत कांस्य पदकावर कब्जा केला. पदक विजेत्या या संघाला तुकडोजी महाराज विद्यापीठ्याचे कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या हस्ते पदक, चषक व प्रमाणपत्र असे बक्षीस देऊन गौरवले. शिवाजी विद्यापीठाच्या संघाला क्रीडा विभागाचे क्रीडा व शारिरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे, अजय मराठे, प्रा. डॉ. सुनील चव्हाण, प्रा. डॉ. राजेंद्र रायकर, यांचे मार्गदर्शन लाभत आहे.



**कोल्हापूर : महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धेअंतर्गत झालेल्या टेबल टेनिस स्पर्धेत कांस्य पदक विजेत्या शिवाजी विद्यापीठाच्या पुरुष संघासोबत प्रशिक्षक प्रा. सचिन पाटील.**